दिः 28 फेब्रुवारी,2014

# आपला विस्तार करणारी एनडीए

**अरुण जेटली**

विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

श्री रामविलास पासवान यांच्या लोकजनशक्ती पार्टीने भाजपाचे सहयोगी आणि एनडीएचे घटक बनण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच मोठ्या संख्येत राजकीय नेते, प्रतिष्ठित नागरिक आणि राजकीय समूह पक्षात शामिल होऊन किंवा एनडीए सोबत युती करुन भाजपाला आपले समर्थन देणार आहेत. भाजपा/एनडीए आणि नरेंद्र मोदी यांच्या समर्थनार्थ जनमताचे अचानक जोडणे स्पष्ट दिसून येत आहे.

जेव्हा काही राजकीय गट स्वतःची ओळख एनडीए सोबत दाखवतात तेव्हा होऊ शकते की त्यांच्या प्रभावाचे क्षेत्र त्या विशेष राज्यापर्यंत सिमित राहतो. मात्र त्यांच्या शामिल होण्याने एक मोठा राजकीय संकेत दिला जातो. भाजपाने जेव्हा श्री नरेंद्र मोदी यांना आपला पंतप्रधान पदाचा उमेदवार घोषत केले होते तेव्हा मिडीयातील काही मित्र आणि राजकीय पर्यवेक्षकांची पहिली प्रतिक्रिया होती की आता पक्षाला सहयोगी शोधणे खुप मुश्कील काम होईल. त्यांचे मानणे होते की पक्ष राजकीय दृष्ट्या इथर-बिथर होईल. जेव्हा जनमत जोडले जाते, कोणताही पक्ष खुप मोठ्या प्रकारे एकांतात राहू शकते. मात्र तसे झाले नाही. एका कमजोर भाजपाच्या तुलनेत एका मजबूत भाजपामध्ये ही क्षमता आहे की ते अधिक मित्र आणि सहयोगींना आकर्षित करु शकते. भाजपाच्या रॅलीत लोकांची वाढती गर्दी म्हणजे बदल हवा असल्याचे दयोतक आहे. हा स्पष्ट संदेश आहे की वा-याची दीशा कोणत्या बाजूने आहे. आज गुजरात आणि कर्नाटक सारख्या राज्यात लोक भाजपाला सोडून गेले होते ते परत आले आहेत आणि त्यांनी पक्षाची ताकद वाढवली आहे. पंजाब, हरियाणा, महाराष्ट, बिहार आणि तामिळनाडू सारख्या राज्यात आमचे महत्त्वपूर्ण सहयोगी आहेत. अशी अनेक राज्ये आहेत जिथे निवडणूकीच्या आधी निवडणूक युती किंवा निवडणुकीनंतर राजकीय युती कायम होणार असल्याची शक्यता आहे.

माझे नेहमीचे म्हणणे आहे की, एक मजबूत भाजपा एका मजबूत एनडीएच्या दीशेने सरकेल. एनडीएला कसे मजबूत केले जाईल यासाठी अटलजी यांचे पुस्तकातील एक प्रकरण वाचणे गरजेचे आहे. 1996 मध्ये तीन पक्षांची एनडीए 1998 मध्ये 24 पक्षांची बनली. क्षेत्रीय सहयोगींना आकर्षित करण्यासाठी कोणालाही भारताच्या संघीय आणि विविध चरित्राला समजणे गरजेचे आहे. आज लोकप्रिय समर्थन, सहयोगींची वाढती संख्या आणि वाढणा-या युतीच्या सामाजिक चरित्राच्या संयोजनाचे महत्त्व आहे. या सर्व गोष्टी नव्या बदलाचे संकेत देतात.